महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे

फडकेपाडा, भारतगिअर्स समोर, खार्डीगांव, मुंब्रा, ठाणे ४०० ६१२

ई मेल principal.gpthane@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शातंठाणे/वि.वि./२०२५/१८१०

दिनांक ३०/०६/२०२५

## विदयार्थ्यांकरिता सूचना

विषय:शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इ.पदविका संस्थेतील विदयार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल व पहिल्या/दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करणेबाबत.

संदर्भ:-१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्रं.१०/एडीएम/विदयार्थी संस्था बदली/२०२५/२६८, दि.२५.०६.२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये या संस्थेतील विदयार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल (Branch Change) तसेच पहिल्या व दुस-या वर्षानंतर संस्था बदल (Institute Change) करिता पात्रता खालीलप्रमाणे आहे. तरी इच्छुक विदयार्थ्यांनी खालील पात्रतेनुसार अर्ज करावयाचे आहेत.

| अ क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ रे वर्ष प्रवेशासाठी | पदविका पाठयक्रम बदल/संस्था बदल | प्रथम व व्दितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठयक्रम/संस्था बदलीस विनंती केलेल्या शाखेत संबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता |
| २ | ३ रे वर्ष प्रवेशासाठी | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, व्दितीय वर्षाच्या परिक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयांपैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विनंती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता |

पाटयक्रम बदल किंवा संस्था बदलासाठी नियमानुसार पात्र इच्छुक विदयार्थ्यांनी ज्या शैक्षणिक संस्थेत पाटयक्रम बदल/संस्था बदल पाहिजे अशा शैक्षणिक संस्थेकडे त्यांचा विनंती अर्ज(Annexure-A) मध्ये दर्शविलेल्या आवश्यक कागदपत्रांसह दि.०१/०७/२०२५ पर्यंत या संस्थेत विदयार्थी विभागात सादर करावा. तसेच अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक कागदपत्रांविना सादर केलेल्या अर्जाबाबत संबंधित विदयार्थ्यांना काहीही न कळविता अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

संस्था बदली करिता वरिल संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे क ते ज प्रमाणे कागदपत्रांसह परिपूर्ण (Annexure-A)अर्जांचा विचार करण्यात येईल, याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन ठाणे

प्रत :- १) सूचना फलक , शा.तं.ठाणे यांना माहितीकरीता. २) सर्व विभागप्रमुख यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता.३) संस्था संकेतस्थळ, शा.तं.ठाणे यांना माहितीकरीता.



Scanned with OKEN Scanner